# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad

Date – 10 October 2023

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी औरंगाबाद**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १० ऑक्टोबर २०२३ सकाळी ७.१० मि.**

****

- राज्यात ३४ जिल्ह्यांमध्ये सुपर स्पेशालिटी रुग्णालयं उभारण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
- परळी वैजनाथ, घृष्णेश्वर आणि सप्तशृंग तीर्थक्षेत्रांच्या ५३१ कोटी रुपयांच्या सुधारित आराखड्यास मान्यता
- आमदार अपात्रता प्रकरणी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या याचिकेवर येत्या शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात एकत्र सुनावणी

आणि

- अपहरण, अत्याचार आणि हत्येप्रकरणी लातूर सत्र न्यायालयाची दोघांना जन्मठेप

****

राज्याच्या ३४ जिल्ह्यांमध्ये सर्व सुविधांयुक्त सुपर स्पेशालिटी रुग्णालयं उभारण्याचे निर्देश, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेबाबत काल मंत्रालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. ग्रामीण भागातली आरोग्य यंत्रणा मजबूत करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. येत्या पंधरा दिवसांत सचिवांच्या समितीने नवीन वैद्यकीय महाविद्यालयांच्या जोडीने ही रुग्णालयं उभारण्याबाबत आराखडा तयार करण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी केली आहे. सार्वजनिक आरोग्यावरील खर्च दुप्पट झाला तरी निधी कमी पडू देणार नाही, असं आश्वासन त्यांनी दिलं. ते म्हणाले..

***‘‘राज्यामध्ये २५ ठिकाणी सिव्हील हॉस्पिटल्स नव्याने उभारण्याबाबतीत देखील निर्णय झाला. आणि त्याचबरोबर मेडिकल कॉलेजचं इन्फ्रास्ट्रक्चर***

***जे आहे, एकदा मेडिकल कॉलेज अनाउंस झालं की त्याबरोबर सिव्हिल हॉस्पिटलची देखील पॅरलली काम सुरू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आरोग्य विभागाला जे बजट लागतं, ते देखील जवळपास दुप्पट बजट खर्च झालं तरीसुद्धा पैसे कमी पडू देणार नाही.''***

वर्ष २०३५ पर्यंत आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षणाचा विचार करून राज्यासाठी आरोग्याचं एक सर्वंकष व्हिजन तयार करण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमण्यासही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा नियोजनातून औषधं तसंच वैद्यकीय उपकरण खरेदी करून घ्यावी, जीवरक्षक, अत्यावश्यक औषधांसाठी वेगळी दरपत्रकं मागवून खरेदी करावी, आरोग्य विभागाच्या सध्या कार्यरत आठ परिमंडळांशिवाय आणखी नऊ परिमंडळांचा प्रस्ताव तातडीने द्यावा, वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, ग्रामीण आणि दुर्गम भागात टेलीमेडीसीन पद्धतीचा वापर वाढवावा, आदी सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

****

परळी वैजनाथ, घृष्णेश्वर आणि सप्तशृंगी देवी तीर्थक्षेत्रांसाठी, ५३१ कोटी रुपयांच्या सुधारित आराखड्यास राज्य शासनानं मान्यता दिली. बीड जिल्ह्यातल्या श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योर्तिलिंग विकासासाठी, २८६ कोटी ६८ लाख रुपये, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या श्री क्षेत्र घृष्णेश्वर तीर्थक्षेत्रासाठी १६३ कोटी रुपये, आणि नाशिक जिल्ह्यातल्या श्री क्षेत्र सप्तशृंगी तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी, ८१ कोटी ८६ लाख रुपयांच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली.

घृष्णेश्वर विकास आराखड्यामध्ये वेरुळ लेणी क्रमांक एक ते महादेव मंदिर हा सुमारे दीड किलोमीटरहून अधिक लांबीचा वळण रस्ता प्रस्तावित असून त्यासाठी २७ कोटी ५८ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

****

राज्यात नांदेडसह औरंगाबाद, नागपूर आदी ठिकाणच्या शासकीय रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर रुग्णांचे मृत्यू होत असताना, सरकारने औषधी खरेदीसाठी स्थापन केलेले स्वतंत्र प्राधिकरण नेमकं काय करतंय, असा प्रश्न माजी मंत्री तथा शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी केला आहे. नांदेड इथं काल शासकीय रुग्णालयास भेट दिल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

त्यापूर्वी आदित्य ठाकरे यांनी काल सकाळी छत्रपती संभाजीनगर इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय–घाटीला भेट देऊन रुग्णांची संख्या, औषधांची उपलब्धता याविषयी माहिती घेतली. आपण फक्त आरोप करण्यासाठी नाही तर परिस्थिती समजून घेण्यासाठी आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी आलो असल्याचं ठाकरे यांनी यावेळी सांगितलं.

****

महाविकास आघाडी सरकारने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी २४ जिल्ह्यात ३० स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रं सुरु केली होती, ही केंद्र बंद असल्याचा आरोप विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ही केंद्रं सुरू करण्यात यावीत, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे केली आहे.

****

शेतकऱ्यांना पीक विमा भरपाई मिळवून देण्यासाठी राज्यभरात मदत केंद्रं उभारण्याची सूचना, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांना केली आहे. त्यांनी काल दूरदृश्य संवाद यंत्रणेद्वारे शिवसेना पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून, याबाबत लक्ष घालण्याची सूचना केली.

****

आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या याचिकेवर येत्या शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात एकत्र सुनावणी होणार आहे. अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्ष वेळकाढूपणा करत असल्याच्या शरद पवार गटाच्या याचिकेवर काल सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयानं हे आदेश दिल्याचं आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सांगितलं.

****

शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये लोकशाहीचं पालन झालं नाही, याचा पुनरुच्चार, अजित पवार गटानं केला आहे. काल या प्रकरणी केंद्रीय निवडणूक आयोगात सुनावणी झाली. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालचा पक्ष हाच मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे आणि त्यांच्याचकडे सर्वाधिक सदस्यांचा पाठिंबा असल्याचा दावा या गटानं केला आहे. याप्रकरणी पुढची सुनावणी ९ नोव्हेंबरला होणार आहे.

****

दक्षिण मध्य रेल्वेनं चार नवीन रेल्वे गाड्या सुरु केल्या आहेत. केंद्रीय पर्यटन मंत्री जी किशन रेड्डी यांनी काल सिकंदराबाद रेल्वे स्थानकावर काझिपेट ते पुणे या रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. रायचूर – नांदेड, कुरनूल – जयपूर आणि बोधन – करीमनगर या गाड्यांना देखील कालपासून प्रारंभ झाला.

****

एका महिलेचं अपहरण, सामुहिक लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणी लातूरच्या सत्र न्यायालयानं महेंद्रसिंह चौहान आणि समीर किल्लारीकर या दोघांना आजन्म कारावास तर चार जणांना तीन वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. लातूर – तुळजापूर मार्गावर २३ मार्च २०१४ रोजी ही घटना घडली होती. याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग–सीबीआयने तपास करून ३० सप्टेंबर २०१९ रोजी आरोपपत्र दाखल केलं होतं.

****

अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी अंबाजोगाईच्या जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीस वीस वर्ष तुरुंगवास आणि पाच हजार रुपये दंड ठोठावला आहे. या इसमाने त्याच्या लिव्ह इन रिलेशनशिपमधल्या जोडीदार महिलेच्या मुलीवर अत्याचार केल्याचं निदर्शनास आल्यावर त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली.

****

वाशीम जिल्ह्यात मालेगाव तालुक्यातल्या बोरगाव जिल्हा परिषद शाळेतले शिक्षक दिलीप सोनुने यांना पेट्रोल टाकून जिवंत जाळल्याची घटना काल घडली. या हत्येमागे वैयक्तिक वाद असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

****

धनगर आरक्षणाच्या मागणीसाठी सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने बीड जिल्ह्यातल्या वडवणी तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. दरम्यान, ऊसतोडणी कामगार आणि वाहतूक संघटनेच्या विविध मागण्यांसाठी काल बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करण्यात आलं.

****

नांदेड – हिंगोली राष्ट्रीय महामार्गावर येलकी शिवारातील कामठा फाटा इथं मनसैनिकांनी काल पथकरमुक्तीसाठी आंदोलन केलं. पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेऊन वाहतुक पूर्ववत केली.

बीड जिल्ह्यात गेवराई तालुक्यातल्या पाडळशिंगीच्या टोलनाक्यावर काल रात्री मनसैनिकांनी तोडफोड आणि जाळपोळ केली. काही आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

बीड जिल्ह्यातले हुतात्मा सैनिक पांडुरंग तावरे यांच्या पार्थिव देहावर काल पाटोदा तालुक्यात काकडहिरा इथं लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. सिक्कीमध्ये ढग फुटी होऊन तिस्ता नदीला आलेल्या पुरात तावरे यांची छावणी वाहून गेली होती, त्यात त्यांचा मृत्यू झाला.

****

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल हैदराबाद इथं झालेल्या सामन्यात न्यूझीलंडनं नेदरलँड्सचा ९९ धावांनी पराभव केला. आज या स्पर्धेत धरमशाला इथं इंग्लंड आणि बांग्लादेश दरम्यान तर हैदराबाद इथं पाकिस्तान आणि श्रीलंकेदरम्यान सामना होणार आहे.

****

शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांच्यावरील हल्लाप्रकरणी अहमदनगर पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. त्यातील एक अल्पवयीन आहे. शाळेजवळील पानटपरी हटवल्याच्या कारणातून हा हल्ला केल्याची माहिती आरोपींनी पोलिसांना दिली, या प्रकरणी आणखी दोन आरोपी फरार आहेत.

****

निवडणूक साक्षरतेचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षर मंडळाची स्थापना करण्याची आवश्यकता असल्याचं मत, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी व्यक्त केलं आहे. काल लातूर इथं यासंदर्भात झालेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. लातूरचं जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय आणि वर्शिप अर्थ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानं जिल्ह्यातल्या प्रत्येक महाविद्यालयात निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करण्यात येणार आहे.

****